मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शुक्रवार, दि. 31 मे 2024 | पान- 1

# अपघात रोखण्यासाठी आरटीओचा पुढाकार

## आरटीओमध्ये राबवला जातोय पायलेट प्रोजेक्ट : खासगी कंपनीच्या संकल्पनेतून वाहतूक नियमांचे धडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढते अपघात रोखण्यासाठी अन् वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी रस्ते सुरक्षा अभियान अंतर्गत क्रुईसिंग सेफ-ड्रायव्हर्स सेन्स टॅब लॅब' सुरू करण्यात आली आहे. खासगी कंपनीच्या माध्यमातून आणि आरटीओच्या समन्वयातून हा प्रयोग सुरू करण्यात आला आहे. त्या माध्यमातून वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांचे आकलन करून देण्यात येत आहे. एका व्हीडीओच्या माध्यमातून वाहतूक नियमन ते चालकाची जबाबदारी अशी जनजागृती सुरू आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास अन्य आरटीओत राबवण्याचा मानस आहे.

पुणे परिसरात वाहन अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी महामार्ग पोलिसांसमवेत आरटीओ विभागदेखील विविध उपयोजना राबवत आहे. त्यानुसार रस्ते सुरक्षा अभियान अंतर्गत विविध जनजागृती आणि योजनादेखील राबवल्या गेल्या आहेत. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयअंतर्गत ही लॅब सुरू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत कोणत्याही अर्जदाराला या चाचणीचे बंधन नाही. मात्र, वाहनचालकांना या चाचणीच्या माध्यमातून वाहतुकीचे नियम आणि जबाबदाऱ्या सोप्या पद्धतीने मांडल्या आहेत. पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयाने या प्रयोगासाठी जागा त्या कंपनीला उपलब्ध करून दिली आहे.

मर्सिडीज बेंज आणि भारत केअर्स या माध्यमातून आणि श्री महाकाल एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट यातून 'ड्रायव्हर्स सेन्स टॅब लॅब' सुरू करण्यात आली आहे. ४ मे पासून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमात साडेपाचशेहून अधिक जणांनी सहभाग नोंदवला. नवीन शिकाऊ परवानाधारकांना हा अभ्यास उपयोगी ठरणार आहे. कार्यालयात वाहन परवाना संबंधित कागदपत्र व्हेरिफिकेशन आणि बायोमेट्रिक केल्यानंतर ही चाचणी देता येते. यात साधारण दहा मिनिटांचा व्हीडीओ आणि वाहतूक संबंधित माहिती मिळते. चाचणी पूर्ण झाल्यानंतर त्या संबंधित सर्टिफिकेट पुरवले जाते. ही चाचणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शिकाऊ परवाना अर्जदारांना ऑनलाइन चाचणीसाठी जाता येते.




“ या माध्यमातून वाहनचालकांना रस्ते अपघात कसे टाळले पाहिजेत हे समजून सांगितले जाते. जास्तीत जास्त जणांनी त्यात सहभाग घ्यावा. येत्या काळात नागरिकांचा वेळ विचारात घेता, याची ऑनलाइन लिंक अथवा क्यू आर कोडवर ही सेवा घेण्याचा विचार आहे. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या वेळेत ती माहिती आपल्या मोबाईलवर अवगत होईल.

**- अतुल आदे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड**

### दिवसभरात 30 ते 40 अर्जदारांचा सहभाग

» आरटीओ कार्यालयात वाहन परवान्यासाठी आलेल्या अर्जदारांना थोडा वेळ असतो. त्या वेळेमध्ये नवीन शिकाऊ परवानाधारकांना वाहतूक नियमांची माहिती व्हावी यासाठी चाचणी घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. दिवसभरातून जवळपास ३० ते ४० अर्जदार ही चाचणी पूर्ण करतात.

# शहरातील सांगवीमध्ये झालेली हत्या टोळीयुद्धातून!

## सांगवी परिसरातील, शंकराच्या पुतळ्यापासून काही अंतरावर अज्ञात व्यक्तीची समोरुन तोंडावर गोळ्या झाडून हत्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड शहरातील सांगवीमध्ये झालेली हत्या ही टोळीयुद्धातून झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. दीपक कदम असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. कदमची रात्री दहाच्या सुमारास अज्ञात दोघांनी तीन गोळ्या झाडून हत्या केली. आरोपी हे दुचाकीवरून पसार झाले. या हत्येची संशयाची सुई ही रेहान शेखच्या टोळीशी जोडली जात आहे. त्या दिशेने पोलीस आणि गुन्हे शाखा तपास करत असून एका संशयितला सांगवी पोलिसांनी अटक केली आहे. तसेच, योगेश जगतापच्या हत्येशी काही संबंध आहे का? याचे देखील धागेदोरे तपासले जात आहेत. दीपक कदम याच्यावर हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

सांगवी आणि पिंपळे गुरवमध्ये खळबळ उडाली. तात्काळ सांगवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या कदमला रुग्णालयात घेऊन जाण्यात आलं. पण, तोपर्यंत फार उशीर झाला होता.

या घटनेचा सांगवी पोलीस आणि गुन्हे शाखा समांतर तपास करत आहेत. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी रेहान शेखची वाकड परिसरात हत्या करण्यात आली होती. यात ढमाले टोळीचा हात असल्याचा संशय पोलिसांचा आहे, तसा तपासही पोलीस करत आहेत. ढमाले टोळी फरार आहे.

दरम्यान, ढमाले टोळीसोबत दीपक कदम असायचा त्यामुळे त्याचाही रेहानच्या हत्येत सहभाग असल्याच्या संशयावरून रेहान शेखच्या टोळीच्या सदस्यांनी हत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्या दिशेने पोलीस तपास करत आहेत. या सर्व घटनेचा योगेश जगतापच्या हत्येशीही काही संबंध आहे का? याचा देखील पोलीस तपास करणार आहेत, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.



### नेमकी कशी घटना घडली

» रात्री साडे दहाच्या सुमारास दीपक सांगवीमधील सिद्धेश्वर फॅमिली शॉपमध्ये रोजच्या प्रमाणे पान खाण्यासाठी आला होता. त्यावेळी त्याने पान घेतलं आणि रस्त्यावर उभा होता. याचवेळी रस्त्यावरुन दोन अज्ञात व्यक्ती या परिसरात पोहचले आणि चालत्या दुकाचीवरुन त्याने दीपकच्या डोळ्यात आणि पाठीवर गोळ्या घातल्या. यात दीपकचा जागीच मृत्यू झाला. वर्चस्वाच्या वादातून हा मृत्यू झाला आहे आणि त्याच्यावर झालेल्या गोळीबारामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा एकदा टोळीयुद्ध पाहायला मिळालं आहे.

# ‘ससून’मधील अधिष्ठातांवरही कारवाई

## डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हाळनोर यांना अटक : डॉ. विनायक काळेंना सक्तीच्या रजेवर जाण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोर्श अपघात प्रकरणाची सध्या जोरदार चर्चा सुरू असून हे प्रकरण रोज नवे वळण घेत आहे. याप्रकरणी पोलिसांकडून ससून रुग्णालयाच्या दोन डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीदेखील स्थापन करण्यात आहे. यादरम्यान आता ससून रुग्णालयाच्या अधिष्ठातांवरदेखील कारवाई करण्यात आल्याचं पुढे आलं आहे.

एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्यावर कारवाई करत त्यांना तत्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे. तसेच त्यांच्या जागी बारामतीतील अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.




### नेमकं प्रकरण काय?

» पुण्यातील कल्याणीनगर भागात १९ मे रोजी पहाटे भीषण अपघात झाला होता. एका वेगवान पोर्श कारने दुचाकीवरील दोघांना उडवलं. ही पोर्श कार एक अल्पवयीन चालक चालवत होता. तसंच, तो मद्यधुंद अवस्थेतही होता. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आता पोलिसांनी आता अल्पवयीन आरोपी त्याच्या वडिलांना अटक केली आहे.

### ससूनच्या दोन डॉक्टरांवर कारवाई

» दरम्यान, यापूर्वी अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचा अहवालात फेरफार केल्याप्रकरणी ससून रुग्णालयातील डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हाळनोर यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यांना ३० मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यापैकी एका डॉक्टरने ससून रुग्णालयातील कर्मचाऱ्याकडून तीन लाखांची लाच घेतल्याचाही प्रकार समोर आलं आहे.

**बाल न्याय मंडळाच्या सदस्यांच्या वर्तनाचीही होणार चौकशी**

महत्त्वाचे म्हणजे याप्रकरणातील अल्पवयीन आरोपीला ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याची शिक्षा सुनावणाऱ्या बाल न्याय मंडळाच्या सदस्यांच्या वर्तनाचीदेखील चौकशी होणार असल्याचे पुढं आलं आहे.


राज्याच्या महिला आणि बालविकास विभागाचे आयुक्त प्रशांत नरनावरे यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. “मला बाल न्याय कायद्यांतर्गत राज्य सरकारने नियुक्त केलेल्या सदस्यांच्या एकूण वर्तनाची चौकशी करण्याचे अधिकार आहेत. अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर करण्याच्या आदेशाच्या संदर्भात सदस्यांची चौकशी करण्यासाठी आम्ही एक समिती स्थापन केली आहे”, असं नरनावरे म्हणाले.

# दोषी आहेत त्यापैकी कुणालाही सोडणार नाही

## पुणे पोर्श अपघात प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची महत्वाची प्रतिक्रिया

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातल्या प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने मद्यधुंद अवस्थेत पोर्श ही कार चालवत अश्विनी कोस्टा आणि अनिश अवधिया या दोघांनाही उडवलं. या दोघांचाही अपघातात मृत्यू झाला. ताशी १६० किमीच्या वेगात हा अल्पवयीन मुलगा पोर्श कार चालवत होता. १९ मेच्या पहाटे ही घटना घडली. या घटनेचे पडसाद अद्यापही उमटत आहेत. या प्रकरणात सुरुवातीला मुलाला जामीन मिळाला होता. मात्र या घटनेबाबत रोष व्यक्त झाल्यानंतर या मुलाच्या वडिलांना आणि आजोबांना अटक करण्यात आली. तसंच या मुलाची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. या प्रकरणात जे दोषी आहेत त्यापैकी कुणालाही सोडणार नाही असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



### देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?

» “पुणे अपघात प्रकरणात योग्य प्रकारे कारवाई चालली आहे. काही लोक याचं राजकीयीकरण करत आहेत. ते कुणाच्या इशाऱ्यावर असं करत आहेत हे पण समोर येतं आहे. प्रकरण एकीकडे आहे पण या प्रकरणाच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय डाव खेळला जातो आहे ते पण समोर येतं आहे. या सगळ्यांचा पर्दाफाश होईल. तसंच पुण्याच्या प्रकरणात पहिल्या दिवशीही सांगितलं होतं तेच पुन्हा सांगतो, कुणालाही सोडणार नाही म्हणजे नाही. ” असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**१९ मेच्या पहाटे काय झालं?**

पुण्यात १९ मेच्या पहाटे मद्यधुंद अवस्थेत पोर्श ही कार चालवत एका बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने बाईकवरुन घरी जाणाऱ्या अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांना उडवलं. या दोघांचा या अपघातात मृत्यू झाला. यानंतर या अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली होती. मात्र १५ तासांत त्याला जामीन मिळाला. १५ तासांत त्याला जामीन मिळाल्यानंतर सोशल मीडिया आणि समाजात संताप व्यक्त झाला. १९ तारखेपासून या घटनेवर विविध पडसाद उमटत आहेत. समाजात हा विषय चर्चिला जातो आहे. अशात या मुलाच्या वडिलांना आणि आजोबांना अटक करण्यात आली आहे. तर मुलाची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. या प्रकरणात राजकीय आरोप होत आहेत. मात्र देवेंद्र फडणवीसांनी या प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे.

**नाना पटोले यांनी नेमकं काय म्हटलं ?**

पुणे पोर्श अपघात प्रकरणात सापळे कमिटीची निर्मिती राज्य सरकारने केली. मात्र डॉ. सापळेंवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्यांच्याकडे भाडे तत्वावरची कार आहे. त्या कारचा देखभाल खर्च एक लाख रुपये आहे. अनेक ठिकाणी त्यांची बदली झाली होती. त्या त्या ठिकाणी त्यांनी भ्रष्टाचाराचे उच्चांक गाठले आहेत. पोर्श अपघात प्रकरणात दोषींना वाचवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. ससून रुग्णालय, पोलीस विभाग आणि राज्यकर्त्यांचे लोक यांना वाचवण्यासाठी ही कमिटी निर्माण केली गेली आहे. असा आरोप नाना पटोलेंनी केला आहे. या प्रकरणात एका आमदाराच्या मुलाचा समावेश आहे. तसंच दोन्ही उपमुख्यमंत्री म्हणजेच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार आरोपीच्या पिंजऱ्यात आहेत असंही नाना पटोले यांनी म्हटलं होतं.

नाना पटोलेंनी हे आरोप केलेले असताना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनीही अजित पवारांवर आरोप केले. अजित पवारांनी पोलीस आयुक्तांना फोन केला होता त्यांना काय आदेश दिले ते उघड झालं पाहिजे अशी विचारणा त्यांनी केली. या सगळ्याबाबत विचारलं असता जे दोषी आहे त्यांच्यापैकी एकाचीही गय करणार नाही असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# वाहतूक कोंडीची डोकेदुखी सोडवा

## साधू वासवानी पुलावरील वाहतूक बंद, कोरेगाव पार्क, बंडगार्डनमधील संतप्त नागरिकांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

. शहरातील विविध रस्त्यांवर सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीचा वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

साधू वासवानी पुलाच्या प्रस्तावित पाडकामासाठी पुलावरील वाहतूक बंद करून वाहतूक विभागाने कोरेगाव पार्क- बंडगार्डन भागात वाहतुकीमध्ये मोठे बदल केले. मात्र, त्यामुळे मागील तीन दिवसांपासून येथील नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.

या बैठकीत त्यांनी कोरेगाव पार्क, बोट क्लब, बंड गार्डन या विभागांतील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या बैठकीस धैर्यशील वंडेकर, डॉ. विद्या दामले, समीर रूपानी, भारती पाटील, साथी नैयर, डॉ. बोरगावकर, मनोज फुलपगार, शुभांगी, अमृता चंदानी, मल्लिका साबुनानी, अनाहिता आणि व इतर नागरिक उपस्थित होते.

वाहतूक पोलिसांतर्फे मार्गात केलेले बदल यशस्वी झाले नसून, पर्यायाने वाहतूक कोंडी वाढली. त्यामुळे आता प्रायोगिक तत्त्वावर साधू वासवानी पुलावरील वाहतूक बंद केल्यानंतर कुठल्याही प्रकारचा बदल न करता वाहतूक आहे तशी चालू ठेवावी. यामुळे गर्दीच्या वेळी वाहतूक जरी धीम्या गतीने झाली, तरी कोंडी होण्याची शक्यता फार कमी आहे, तसेच मंगलदास रोड, बंडगार्डन रोड जे एकेरी करण्यात आले आहेत, ते पूर्ववत करण्यात यावेत.

प्रायोगिक तत्त्वावर वाडिया कॉलेज चौक ते जहांगीर चौक हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करून त्या बाजूस जाणारी वाहतूक ही वाडिया कॉलेजवरून डावीकडून पुढे रेसिडेन्सी क्लब चौकातून उजवीकडे वळवून पुन्हा अलंकार चौकातून उजवीकडे वळून जहांगीर चौकात घेता येईल, असे नागरिकांनी एकमताने सांगितले.

वाहतूक कोंडीवर शाश्वत पर्यायासाठीचा आराखडा तयार करत आहे. त्यात मेट्रो, पीएमपीएमएल बस, रिक्षा, टॅक्सी सेवा यांच्यात अधिकाधिक समन्वय साधून सार्वजनिक वाहतूक समस्या बळकट करण्याच्या उपाययोजना करण्यात येतील. पुण्यातील वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील विविध रस्त्यांवर सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीचा वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



### शाळा सुरू झाल्यानंतर कोंडी वाढेल

» शाळा सुरू झाल्यानंतर या भागात स्कूल बस आणि रिक्षामुळे कोंडी वाढेल. त्यामुळे शाळांशी चर्चा करून या बस, रिक्षा रस्त्यावर पार्क न करता त्यांच्या आवारात पार्क करण्याचे आणि शाळा सोडण्याच्या वेळेत थोडाफार बदल करण्यास सुचवावे, असाही निर्णय बैठकीत झाला.

### कोंडी सोडविण्यासाठी मार्गात बदल करावे

» ही कोंडी सोडविण्यासाठी मार्गात बदल करावे, त्यासाठी वेक-अप पुणेकर' आणि धैर्यशील वंडेकर यांच्या वतीने आयोजित बैठकीत रहिवाशांनी वाहतूक कोंडीवर पर्याय सुचवला. त्याबाबत वाहतूक पोलिसांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती वेकअप पुणेकरचे माजी आमदार मोहन जोशी आणि धैर्यशील वंडेकर यांनी दिली.

# तुम्हाला फक्त धंगेकरच दिसतात का?; वसंत मोरे प्रचंड संतापले

## कार अपघात प्रकरणावरून चांगलंच वातावरण तापलं, विरोधकांनी या मुद्द्यावरून रान उठवलं आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यातील पोर्श कार अपघात प्रकरणावरून चांगलंच वातावरण तापलं आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरून रान उठवलं आहे. तर दुसरीकडे या प्रकरणावरून राजकीय नेत्यांमध्येच जुंपली आहे. हे प्रकरण कुणी उजेडात आणलं यावरून श्रेयवादही सुरू झाला आहे.

पुणे पोर्श अपघात प्रकरणी फक्त काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांच्यावरच मीडिया फोकस करत असल्याने वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि पुणे लोकसभेतील उमेदवार वसंत मोरे चांगलेच संतापले आहेत. तुम्हाला फक्त धंगेकरच दिसतात का? भरपूर ठिकाणी तुम्हाला धंगेकर दिसत आहेत. जो विषय चालला त्याबद्दल विचारा. आम्ही या घटनेचा निषेध केला. पहिल्यांदा आम्हीच आवाज उठवला. मीडियाला फक्त धंगेकरच दिसतात, असं म्हणत वसंत मोरे यांनी आपला संताप व्यक्त केला.



### नियम शिथिल करा

» पुण्याच्या प्रकरणात कुठल्यातरी मंत्र्याने फोन केल्याचं आंबेडकर म्हणाले. अग्रवाल नावाच्या बिल्डरची भागीदारी कुठल्या-कुठल्या राजकीय पक्षांसोबत आहे, कुठल्या राजकीय मंत्र्यांसोबत आहे किंवा कुठल्या राजकीय मंत्र्यांचे पैसे अडकलेले आहेत, याची चौकशी करावी आणि चौकशी करून कोणी फोन केला हे पोलिसांना विचारावं, असा सल्ला आंबेडकरांनी दिला आहे. दुसरं म्हणजे अपघात वाढत चालले आहेत. त्यामुळे अल्पवयीन आहे म्हणून त्याला कमी शिक्षा हा नवीन नियम आला आहे. हा नियम शिथिल करायला हवा. 18 वर्षा खालील मुलांना बार किंवा पबमध्ये प्रवेश दिला जाऊ नये, त्यांना प्रवेश देणाऱ्या मालकाला 3 वर्षांची शिक्षा करावी, त्याचा परवाना रद्द करावा आणि दहा लाख रुपये दंड करावा, अशी तरतूद परवण्यामध्येच करावी असा सल्ला आंबेडकरांनी दिला आहे.

### मनातून मनुस्मृती काढा

» दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका केली आहे. आव्हाडांचं आंदोलन हा शरीरातून मनुस्मृती घालावण्याचा प्रकार आहे. मनातून मनुस्मृती गेली का? मनातून जोपर्यंत मनुस्मृती जात नाही, तोपर्यंत आपण कृती करताना ती डोळस राहत नाही, अशी टीका प्रकाश आंबेडकरांनी केली आहे. आव्हाडांनी धर्मवादी, निरपेक्षवादी, धर्मवादी आहे. असा ढिंढोरा पिटला तरी आधी त्यांनी मनातून मनुस्मृती काढावी, असा सल्लाही आंबेडकरांनी आव्हाडांना दिला आहे.

जितेंद्र आव्हाड यांच्या हातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला गेला. त्यामुळे वसंत मोरे चांगलेच आक्रमक झाले आहेत. वसंत मोरे यांच्या नेतृत्वात आज पुण्यात वंचित बहुजन आघाडीने जोरदार आंदोलन करत जितेंद्र आव्हाड यांचा निषेध नोंदवला. यावेळी त्यांनी जितेंद्र आव्हाड यांच्या अटकेची मागणीही केली. जितेंद्र आव्हाड यांना मनोविकार तज्ज्ञाला दाखवा. मग शांत होईल. त्यांना मानसोपचाराची गरज आहे, असा हल्लाच वसंत मोरे यांनी चढवला.

### चुका करतात आणि माफी मागतात

जितेंद्र आव्हाड हे राज्यातील शांतता बिघडवण्याचं काम करत आहेत. जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत आव्हाड सुधारणार नाहीत. दरवेळी चुका करतात आणि माफी मागतात. जितेंद्र आव्हाडांनी काही पहिल्यांदाच माफी मागितली नाही. त्यांनी बाबासाहेबांचा फोटो फाडला आहे. त्याचे काय परिणाम होणार हे त्यांना महाराष्ट्रात फिरताना जाणवणार आहे, असं वसंत मोरे म्हणाले.

# बारामतीकरांचे तोंडचे पाणी पळाले

## आजपासून दिवसाआड पाणीपुरवठा, शहराला 15 दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा

**पुणे | प्रतिनिधी**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, नीरा डावा कालव्याचे आवर्तन बंद झाले असून उपलब्ध पाणीसाठा मर्यादीत असल्याने पर्यायाने बारामती शहरासाठी पाणी पुरवठा एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार असल्याचे नगरपालिका प्रशासनाने कळविले आहे.

संपूर्ण बारामती शहर व ग्रामीण भागात पाणी पुरवठा होईल. दि. शुक्रवार ३१ मे रोजी पाणीपुरवठा होणार नाही. अशाप्रकारे नीरा डावा कालव्याचे पुढील आवर्तन मिळेपर्यंत एक दिवसाआड पाणी पुरवठा होईल याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

बारामतीकरांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शहराला १५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. बारामती शहर ग्रामीण व रुई या भागात दिवसात पाणीपुरवठा केला जाणार आहे. तर जळोची, तांदूळवाडी या भागात दोन दिवसांत पाणीपुरवठा होणार आहे. दि. ६ ते ७ जून रोजी आवर्तन सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, पाठीमागच्या वर्षी देखील पावसाळ्याआधी बारामतीकरांना एक आठवड्यासाठी दिवसात पाणीपुरवठा करण्यात आला होता. आवर्तन सुरू झाल्यानंतर पुन्हा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला.

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, नीरा डावा कालव्याचे आवर्तन बंद झाले असून उपलब्ध पाणीसाठा मर्यादीत असल्याने पर्यायाने बारामती शहरासाठी पाणी पुरवठा एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार असल्याचे नगरपालिका प्रशासनाने कळविले आहे.



### तीन साठवणतलावाद्वारे पाणीपुरवठा

» बारामती शहरातील पाटस रोडला दोन साठवण तलाव आहेत. तसेच जळोची येथे एक साठवण तलाव आहे. तीन साठवण तलावातून बारामती शहरातील १ लाख ६० हजार नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. तीन तलावांची क्षमता ७०५ एम एल एवढी आहे. बारामतीची लोकसंख्या वाढत असून पाण्याची मागणी देखील मोठ्या प्रमाणात आहे . साठवण तलावांची क्षमता कमी असल्याने पावसाळ्याआधी काही दिवस दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत आहे.

### ही कामे प्रगतीपथावर

» शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता नव्याने तीन साठवण तलावाची निर्मिती होत आहे. शहरातील घारे इस्टेट जळोची व तांदूळवाडी येथे साठवण तलावांचे काम अंतिम टप्प्यात आहे. तीन तलावांची क्षमता ६०० एमएल इतकी आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत काम पूर्णत्वास जाईल. त्यानंतर कदाचित बारामती शहराला पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही.

### नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने आवाहन

» गुरुवार दि. ३०मे २०२४ रोजी संपूर्ण बारामती शहर व ग्रामीण भागात पाणी पुरवठा होईल व शुक्रवार दिनांक ३१ मे २०२४ रोजी पाणीपुरवठा होणार नाही. अशाप्रकारे निरा डावा कालव्याचे पुढील आवर्तन मिळेपर्यंत एक दिवसाआड पाणी पुरवठा होईल याची सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# वारकऱ्यांना उत्तम सोयी उपलब्ध करुन द्या

## जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना, जिल्हाधिकाऱ्यांचा आळंदी पाहणी दौरा

**पुणे | प्रतिनिधी**

"सुरक्षित वारी, हरित वारी" या संकल्पनेवर आधारित या वर्षीची वारी असावी, राज्यभरातून आषाढी वारीनिमित्त संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना उत्तम सोयी उपलब्ध करून द्या, सर्व प्रशासकीय यंत्रणानी आपापसात समन्वय ठेवून कामकाज करावे, अशा सूचना पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

29 जून रोजी संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. या प्रस्थान सोहळ्यासाठी लाखो भाविक तीर्थक्षेत्र आळंदीला येतात. त्या पार्श्वभूमीवर आज बुधवारी (दि. 29) जिल्हाधिकारी यांनी आळंदी येथील मंदिर परिसर, दर्शनबारी जागा, भक्तीसोपान पुल, स्कायवॉक, नदी पात्रातील जलपर्णी, प्रदक्षिणा मार्ग यांची पाहणी करून प्रशासकीय यंत्रणांना दिशानिर्देश दिले, अशी माहिती आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी दिली. सदर पाहणी दरम्यान मंदिर समिती विश्वस्त तथा पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ, डी. डी. भोसले यांनी जिल्हाधिकारी यांना विविध मागण्या केल्या.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, हवेली प्रांत संजय आसवले, खेड तहसीलदार प्रशांत बेडसे, आळंदीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, मुख्याधिकारी कैलास केंद्रे, देवस्थानचे विश्वस्त तथा पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजन नाथ, डी.डी. भोसले पाटील, माऊली मंदिराचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, नगरपरिषदेचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.



### भक्ती सोपान पुलाची डागडुजी

» पुणे जिल्हाधिकारी दिवसे यांनी दरवर्षी प्रमाणे दर्शन बारीची जागा वारी कालावधीत प्रशासनाच्या ताब्यात घेण्याचे आदेश लवकरात लवकर निर्गमित करण्याच्या सूचना हवेली प्रांताधिकारी अस्वले यांना दिल्या. तसेच भक्ती सोपान पुलाची डागडुजी साठी आवश्यक निधी मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागास दिल्या.

### आषाढी यात्रा तयारीचा आढावा

» येत्या काळात जलपर्णी नियमित काढता यावी या साठी आळंदी नगरपरिषदेस जेसीबी, पोकलँड मशीन खरेदी करण्यास निधी उपलब्ध करून दिला जाईल सर्व प्रशासकीय यंत्रणानी आपापसात समन्वय ठेवून कामकाज करण्याचे सूचनादेश पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी आळंदीतील अचानक पाहणी दौऱ्यात उपस्थित अधिकाऱ्यांसह कर्मचारी यांना दिले अचानक पाहणी दौरा करीत येथील कामाची पाहणी करीत आषाढी यात्रा तयारीचा आढावा घेतला.